अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिताच्या पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्वयंम-१४२६/प्र.क्र.३८/का.१२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ०४ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का.१२, दि.१५.१०.२०१६
२) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का.१२, दि.२७.११.२०१८
३) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का.१२, दि.१६.०९.२०१९
४) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.शिष्यवृ-१५२२/प्र.क्र.८७/का.१२, दि.१५.०५.२०२३
५) आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयाचे पत्र क्र.शावगृ-२०२०/प्र.क्र.०८/का.९(२)/६८९, दि.०६.०३.२०२५
६) दि.०५.०३.२०२६ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय.
७) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.११.०५.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे याकरिता विभागामार्फत विभागीय स्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर आणि ग्रामीणस्तरावर शासकीय वसतीगृहे कार्यान्वित आहेत.

विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने त्याप्रमाणात शासकीय वसतीगृहांतील उपलब्ध प्रवेश क्षमता कमी पडू लागल्याने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या परंतु शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी संदर्भाधीन दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली. सदर योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास, निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यात येते.

सद्यस्थितीत सदर योजनेंतर्गत इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण किंवा इयत्ता १० वी नंतरच्या दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या परंतु शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन,

निवास व निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्यासाठी निश्चित केलेल्या दराने प्रतिवर्ष ठोक रक्कम डी.बी.टी.द्वारे त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत अनुदानाचे निर्धारित करण्यात आलेले दर हे सन २०१८ मध्ये निर्धारित करण्यात आलेले असून त्यानंतर सदर रक्कमांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. आदिवासी विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेता, तसेच महागाई निर्देशांकाचा विचार करता सदर योजनेंतर्गत देय असलेल्या भत्त्यांच्या रकमेत वाढ करणे तसेच शासकीय वसतीगृहांची मर्यादित विद्यार्थी क्षमता आणि विद्यार्थ्यांचा विविध अभ्यासक्रमांकरिता वाढता कल लक्षात घेता सदर योजनेची व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा.मंत्रीमंडळाच्या दि.०६.१०.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार, अनुसुचित जमातीच्या विदयार्थ्यांकरिताच्या पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे.

(१) इयत्ता १० वी नंतरच्या दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य महाविद्यालयात/संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या परंतू शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या तसेच ज्या ठिकाणी शासकीय वसतीगृह सुविधा उपलब्ध नाही तेथे शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे.

(२) सदर योजनेंतर्गत अनुदानाचे सुधारित दर खालीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

अ. क्र.	खर्चाची बाब	मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता (रुपये)	इतर महसुली विभागीय मुख्यालय, "क" वर्गीय महानगर पालिका क्षेत्र या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता	इतर जिल्हा ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता	रकाना ३ ते ५ मधील क्षेत्र वगळता राज्यात इतर ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता
१	२	३	४	५	६
१.	भोजन भत्ता	४२०००	३७०००	३२०००	३००००
२.	निवास भत्ता	२८०००	२१०००	१७०००	१३०००
३.	निर्वाह भत्ता	१००००	१००००	८०००	७०००
एकुण		८००००	६८०००	५७०००	५००००

(३) वैद्यकीय व अभियांत्रिकीय विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.८०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.४०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येत आहेत.

२. योजनेतील उपरोक्त सुधारणा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

३. उपरोक्त सर्व लाभ डीबीटीमार्फत अदा केले जातील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०४११२२१७६०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SARJERAO SHIVAJIRAO PATIL

Digitally signed by SARJERAO SHIVAJIRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2D080100DB919AF47F90E1DB6E9619B378E138DC014065C22B0CDFE1CC5CCC38, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AA89CF93AD925B079029AE4C36781C9345B874A8C0347351CB54D6CC08F5EC7A, cn=SARJERAO SHIVAJIRAO PATIL
Date: 2026.11.04 11:23:25 +05'30'

(सर्जेराव पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५. व्यवस्थापक, माहिती व तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई
१६. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. सचिव (आदिवासी विकास) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१८. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
१९. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२०. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर

२१. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२४. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२६. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय
२७. निवडनस्ती (का.१२)